माहितीचा अधिकार

शहर अभियंता कार्यालय
बां.वि.विभाग झोन क्र ३
स्वा. सावरकर उद्योग भवन
पुणे महानगरपालिका
आवक क्रमांक :-झोनक्र३/EC2
दिनांक :- २८/०४/२०२६

अपिल प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
पुणे महानगरपालिका.

अपिल क्रमांक : पुणे महानगरपालिका /अ.प्रा. तथा उप अभियंता /अपिल ८९४८/ दि. ३०/०३/२६

अपिलकर्त्याचे नाव व पत्ता :- श्री. दिनकर गोविंद कोतकर
५ साई गणेश विश्व ,
समर्थनगर, हिंगणे खुर्द,
पुणे ४११ ०५१

जन माहिती अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा :- श्री. माधव बोबडे
जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता,
बांधकाम विकास विभाग,
झोन क्र ३, पुणे मनपा

श्री. दिनकर गोविंद कोतकर
विरूध्द
जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, पुणे महानगरपालिका.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

माहिती अधिकारातील अर्जाचा तपशिल				
माहिती अधिकारांतर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक	माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक	अपिलार्थीस उत्तर पाठविल्याचा दिनांक	अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक	अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक
१	२	३	४	५
आ.क्र. झोन क्र. ३/७८२३ दि.२०/०२/२०२६	दि.१९/०३/२०२६	झोन क्र.३/८२९४ दि.१७/३/२०२६	-	निरंक

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण :- माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम कलम ७ (१) उल्लंघन केल्यामुळे

प्रथम अपिल अर्जाचा तपशिल				
प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक	प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक	प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का?	प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का?	प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक
१	२	३	४	५
दि.१७/४/२०२६	दि.३०/३/२०२६	होय	--	झोन क्र.३/२९३ दि.१५/४/२०२६

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. २१/०४/२०२६ ठेवणेत आले होते. परंतु कार्यालयीन कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने सदरचे अपील दिनांक २२/०४/२०२६ रोजी दु. ३.३० वाजता ठेवण्यात आले त्यानुसार अपिलार्थीस दूरध्वनीव्दारे पुर्वकल्पना देण्यात आलेली होती.

सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस जन माहिती अधिकारी :- उपस्थित

जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या उत्तराचा /माहितीचा तपशिल :-

अ.क्र.	प्रश्न/विचारलेली माहिती	उत्तर/पुरविलेली माहिती
	मौजे कोथरूड, ता. हवेली , पुणे येथील स.नं. ७९/१५ , बाबतची कागदपत्रे मिळावीत. १) ७/१२ उतारा २) मोजणी नकाशा ३) क प्रत ४) निवेदन ५) युएलसी आदेश/ना हरकत प्रमाणपत्र ६) डी पी ओपीनियन ७) सर्व प्रतिज्ञापत्र /बंधपत्रे	महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.७१/१८ (र.व.का.) दि.१४/१०/२०१९ रोजीचे शासन निर्णय व मे. उच्च न्यायालयाचे दावा क. २४९२/२०२४ मधील दि.२३/१०/२०२४ च्या आदेशान्वये शासकिय कार्यालयात अर्ज करणे, विल्हेवाट लावण्याबाबत असलेल्या शासन आदेशाचा आधार घेवून व्यक्तिगत गा-हाण्या संदर्भात अर्ज ज्या व्यक्तीवर अन्याय झालेला असेल त्याच्याकडून स्वीकारण्यात यावेत. एंजटकडून किंवा त्यांच्यामार्फत शासनास करण्यात आलेल्या अर्जाची दखल घेण्यात येऊ नये, अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे वयस्थ व्यक्ती / संस्था यांच्याकडून अन्य

	व्यक्तीच्या वैयक्तिक गाहाण्यासंबंधि पत्रव्यवहार किंवा पाठपुरावा करण्यात आल्यास त्याची दखल घेऊ नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. वर नमूद शासन आदेशाच्या अनुषंगाने विषयात नमूद मिळकतीशी असलेला आपला वैयक्तिक हितसंबंधि कळविल्यास आपले मागणीनुसार सदर मिळकतीबाबत या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या प्रती आवश्यक ते शुल्क आकारून आपणास देण्यात येतील.

विवेचन

अपिलार्थी श्री. दिनकर कोतकर यांनी आ.क्र. ७८२३ दि. २०/०२/२०२६ अन्वये माहिती अधिकारात अर्ज दाखल केला आहे. अर्जामधील नमुद मिळकतीबाबत ७ कागदपत्रांची मागणी त्यांनी केली आहे. त्याच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी श्री माधव बोबडे यानं अपिलार्थी यांना जा.क्र. ८२९४ दिनांक १७/०३/२०२६ अन्वये मुदतीमध्ये पत्र पाठविले असुन त्यामध्ये वैयक्तिक हितसंबधाबाबत कळविणेत कळविले आहे.

अपिलार्थी श्री दिनकर कोतकर यांनी आ.क्र. ८९४८ दि. ३०/०३/२०२६ अन्वये विसंगत उत्तर दिल्याच्या काणास्तव प्रथम अपिल अर्ज दाखल केला अहो. अपिलार्थी श्री दिनकर कोतकर यांनी दि. १७/०३/२०२६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने हितसंबंधत बाबत कागदपत्रे दाखल केल्याचे दिसुन येत नाही.

वरील प्रमाणे अवलोकन करता खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात आलेले आहेत.

माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (६) अन्वये आदेश

१) ***जनमाहिती अधिकारी यांचे दिनांक १७/०३/२०२६ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने अपिलार्थी यांचेकडून हितसंबंधाबाबत कागदपत्रे दाखल केली नाही. त्यांचा प्रथम अपिलाचा अर्ज निकाली काढणेत येत आहे.***

२) ***त्यानुसार अपिलार्थी*** यांचा प्रथम अपिलाचा अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

२७।४

(विलास नवाळी)
प्रथम अपिलीय अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता
बांधकाम विकास विभाग झोन क्र.३,
पुणे महानगरपालिका.

दिनांक :- २२/०४/२०२६